आरएनआय रजि नं. MAHMAR/2011/40781 पोष्ट परवाना No.G/NMD/128/2012-14

# नागरिक अधिकार


संपादक : सुभाष बसवेकर

वर्ष ४ थे. अंक ११ वा. नवी मुंबई दिनांक १ ते ३० जून २०१५ पाने ८ किंमत २० रूपये



## होय आम्ही स्वतंत्र देशातील गुलाम नागरिक आहोत !

## आमचा पैसा आम्हाला पाहिजे हिशोब !



...द्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अनुसार ...
(जोडपत्र " अ "नियम ३ नुसार)

...माहिती अधिकारी
.............................
.............................

१) अर्जदाराचे नांव - ------------------------------
२) अर्जदाराचा पूर्ण पत्ता : ------------------------------
३) माहितीचा विषय - ------------------------------
४)आवश्यक असलेल्या माहितीचा तपशील व कालावधी (पुढीलप्रमाणे)
मी आपल्या शासकीय कार्यालयात मी माझ्या ------------------------------ या कामासाठी दि. ---------- रोजी अर्ज / आवेदन केलेले आहे. सोबत प्रत जोडत आहेत.
या संबंधी मुद्देनिहाय माहिती मला माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये द्यावी.
अ) मी अर्ज केल्यापासून आज पर्यंत माझ्या अर्जावर घेतलेल्या दैनंदिन निर्णयाची नोंद व सद्यस्थितीच्या नोंदीची नोंदवहीतील झेरॉक्स प्रत द्यावी.
ब) माझ्या अर्जावर सक्षम अधिकारी यांनी शेरा / टिपणणी नोंदीची झेरॉक्स प्रत द्यावी.
क) शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ अन्वये नागरिकांची सनद प्रमाणे माझे काम पूर्ण होण्याचा कालावधीची मुदत संपूनही जर माझे काम झालेले नसेल तर तेथून पुढे झालेल्या विलंबास जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्याचे / कर्मचाऱ्याचे नाव व हुद्दा द्यावा.तसेच झालेल्या विलंबासाठी त्यांना काय कायदेशीर शास्त्र /दंड व कार्यवाही होणार आहे याची कायदेशीर तरतूद असणारी नोंद / माहिती द्यावी.
५) माहिती टपालाने हवी की व्यक्तिश : स्पीड पोष्टाने / व्यक्तीश : घेऊन जाईन
६) अर्जदार दारिद्र्य रेषेखालील नाही (१० रूपयाचा कोर्ट फी स्टॅम्प जोडला आहे)
ठिकाण : ----------
अर्जदाराची सही




## आरटीआय अर्ज करा पटकन अडलेले सरकारी काम होईल झटकन !

माहिती अधिकार कायद्याचा प्रसार करणारे झुंजार मासिक !

मासिक **नागरिक अधिकार**

**सुभाष बसवेकर**
● संपादक ●
**गणेश काजळे-पाटील**
●कार्यकारी संपादक●

संपादक मंडळ /प्रतिनिधी

रामशंकर सरोज (मुंबई)
गौतम गायकवाड (नवी मुंबई)
देविदास चौथमल (औरंगाबाद)
भगवान वाहूळे (पूणे)
हरिभाऊ माटेटवार (नागपूर)
सुशांत चोणकर (रायगड)
राजेश बने (रत्नागिरी)
अभिजित पटवा (कोल्हापूर)
प्रीतम यादव (सातारा)
संभाजी सावंत (सांगली)
इब्राहिम पठाण (औरंगाबाद)
मोतीराम काळे (नांदेड)
स.अहमद स.अली अन्सारी(परभणी)

अंक दर महिन्याच्या दहा तारखेला प्रकाशित होतो. अंकात प्रकाशीत झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही सर्व वादविवाद पनवेल नवी मुंबई न्यायालय कक्षेत.

पत्ता : **नागरिक अधिकार**
प्लॉट नं. डी-२२ सेक्टर-१२
खारघर, नवी मुंबई ४१०२१०
मो.९२२३५१६९२०
E-mail :
mediamansubhash@gmail.com
: web site :
rtimahasangh.weebly.com

## संपादकीय...........

# भूजबळ ते धनबळ !

महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री छगन भूजबळ यांच्या संपत्तीचा तपशील बाहेर आला आणि राजकारणातील धनबळाचा कर्करोग समाजात किती खोलवर रुजला आहे.हे दिसून आले.भूजबळाकडे अडीच हजार कोटीची संपत्ती असल्याचे आकडे आले असून एक राजकारणी माणूस इतकी प्रचंड माया जर कमवित असेल तर एक भयानक अशा अराजकाकडे आम्ही मंदपणे सरकत आहोत याचे हे एक भयसूचक लक्षण आहे.

या प्रकरणात एक भूजबळ दोषी आहेत असे आम्ही मानत नाही भूजबळांकडे जे अडीच हजार कोटी रुपयांची संपत्ती मिळाली ती सर्वच सर्व संपत्ती भ्रष्टाचारातून कमावली असे म्हणणे अन्यायाचे होईल पण हे अडीच हजार कोटी रूपये प्रमाणिकपणे घाम गाळून कमाविले आहेत हे ही खरे नाही.एका भूजबळाकडे उघड ऐवढे पैसे व संपत्ती असेल तर लपवून व दडवून ठेवलेली संपत्ती किती असेल असा कल्पना विलास लोक करीत आहेत.भूजबळांच्या तोलामोलाचे किमान शंभर राजकारणी सत्ताधीश महाराष्ट्रात असून ते सर्व लोकशाहीचे रक्त पिणारे सत्तापिपासू आहेत.हे सगळयांनाच माहित असणारे उघड गुपीत आहे. सत्तेतून पैसा आणि पैशातून पुन्हा सत्ता या दुष्टचक्रात सद्याचे राजकारण गुंतले असून राजकारणात टिकून राहायचे तर अवाढव्य पैसा लागतोच या मानसिकतेतून जनतेच्या पैशावर डल्ला मारुन राजकारणी आपल्या तुंबड्या भरीत आहेत.

लाचलूचपत विभागाने भूजबळावर केलेल्या कारवाईमुळे भूजबळांना शिक्षा होईल की ते सर्व आरोपातून मुक्त होईन सन्मानाने बाहेर येतील ते काळच ठरवेन.परंतु राजकारणाात धनबळाचा काटा किती खोलवर रूतून बसलाय याचा नमूना जनतेला पाहायला मिळाला राजकारण सेवा करण्याचे क्षेत्र राहिले नसून ते मेवा खाण्याचे डेस्टीनेशन ठरले आहे हे दुर्दैव महाराष्टाला पाहवे लागत आहे.

मा.यशवंतराव चव्हाण यांच्या सारखा मोठा राजकारणी माणूस, पण जेव्हा त्यांचे निधन झाले तेव्हा त्यांच्याकडे घरात १० हजार पुस्तके आणि बँकेत केवळ २० हजार रूपयांची रोकड होती.बाकी श्री शिल्लक शून्य ! पण त्याच यशवंतरावाचे मानसपूत्र श्री.शरद पवार यांनी राजकारणातल्या धनबळाला मुक्त संम्मती दिली. त्याच शरद पवारांचे मानसपूत्र (आणि पर्यायाने यशवंतरावाचे मानसनातू ) भूजबळ,तटकरे,अजित पवार आदी अन्य प्रभूतीने गेल्या दहा वर्षात महाराष्ट्राच्या राजकारणात जो धनधिंगाणा घातला आहे तो पाहता राजकारणातील पैसा खूदा नही है लेकीन खूदा से भी कम नही है । हे भरत वाक्य किती सार्थ ठरलेले आहे याची प्रचिती येते.

# होय आम्ही स्वतंत्र देशातील गुलाम नागरिक आहोत



त्यांनी व्यवस्थाच अशी
बनवली आहे की
आमचे हात बांधलेले राहावेत,
तसेच पायात बेडया राहव्यात नेहमीच.
आमच्या कपाळावर
“ हे स्वतंत्र आहेत ”
अशी मुद्रा मारली आहे !
वरून खासीयत ही की,
आमचे तोंड उघडे ठेवून
त्यांनी बहिऱ्यांचे सोंग घेतले आहे !
ते कल्याणकारी व्यवस्थेचे
घटनात्मक मठाधिपती,
आणि
आम्ही खोट्या लोकशाहीतील
खरे गुलाम !

स्वातंत्र्यपूर्व काळात आमच्यावर इंग्लडच्या राणी चे राज्य होते.गरीब आणि असहाय्य भारतीय जनतेला लूटायचे आणि राणी आणि तिचे राज्य सांभाळणाऱ्या सरदारांनी वैभवात सत्ता उपभोगायची हाच इंग्लडच्या राणीचा प्रमुख उद्देश होता.इंग्रजांनी आमच्यावर १५० वर्षे राज्य केले.इंग्रज मोठे चतूर , लबाड आणि धूर्त .फोडा आणि राज्य करा या नीतीने त्यांनी भारतीय जनतेला नेहमीच मूर्ख बनवून अफाट शोषण केले.या गोऱ्या सायबांची सत्ता कधीच जाणार नाही.असे नेहमीच बोलले जायचे.संस्थानिक आणि धनाडय लोक त्यांचे मांडलिक झाले होते.परतुं या देशातील गरीब आणि सामान्य जनतेनी गांधी,नेताजी,भगतसिंग आणि सावरकर अशा विविध प्रवाही नेतृत्वाच्या बरोबर प्रखर लढा देवून इंग्रजांची सत्ता हाकलून लावली.ज्यांच्या राज्यावर सूर्य मावळत नव्हता ते बलाढय इंग्रज साध्या भोळ्या भारतीयांनी पळवून लावले . १९४७ ला भारत स्वतंत्र झाला.आणि २६ जानेवारी १९५० पासून सामान्य जनता या देशाची मालक झाली.परतुं गेल्या ६५ वर्षात सामान्य माणसाला मी या देशाच मालक आहे.असा अनुभवच कधी आला नाही व येत नाही.कारण आजही सामान्य माणसाला रेशनच्या दुकानामध्ये धड रेशन मिळत नाही.तापाने फणफणलेल्या गरीबाला सरकारी दवाखान्यात एक साधी गोळी मिळत नाही.अंगणवाडीतील लहान मुलांच्या खाऊ मध्ये भ्रष्टाचार होतो.गरीबाच्या मुलांना सरकारी शाळेत धड शिक्षण मिळत नाही.तलाठी लाच दिल्याशिवाय सात-बारा देत नाही.घाम गाळून अन्नाच्या राशी लावणारा शेतकरी अन्नाला मोताद होवून गळफास लावून घेतो.गावात दारिद्रयाने उजाड झालेले गरीबांचे तांडे शहरात आणि महानगरात झोपडपट्टी नाावाच्या नरकात जावून राहू लागतात.जन्माच्या दाखल्यासाठी पासून मृत्यूच्या प्रमाणपत्रासाठीही लाच द्यावी लागते. तहसीलदाराकडे तक्रार करा, कलेक्टर कडे तक्रार करा आमदाराकडे तक्रार करा अगदी दम असेल तर राष्ट्रपती कडे तक्रार करा.सामान्य माणसांच्या तक्रारीची कोठेच दखल व दाद घेतली जात नाही.कारण सरंपचापासून ते राष्ट्रपती पर्यंत निवडून गेलेल्या लोकप्रतिनिधीची एक अदृश्य टोळी बनलेली दिसते.या टोळीला साथसंगत करण्यासाठी गावाच्या तलाठयापासून ते तहसीलदार,कलेक्टर मार्गे केंद्रातील मुख्यसचिवापर्यंत एक पर्यायी टोळी ही निर्माण झाल्याचे दिसते. नेता आणि नोकरशाही या दोन्ही टोळया मिळून एकमेकांचे हितसंबध सांभाळताना दिसतात. या टोळया

जेव्हा समग्र राज्य दु:ख भोगते तेव्हा सारेच अपराधी असतात.- सेंट जस्ट

# होय आम्ही स्वतंत्र देशातील गुलाम नागरिक आहोत

सामान्य माणसांच्या घामातून जमा केलेल्या कररूपी संपत्तीतून लोककल्याणाच्या नावाखाली खा, खिसे भरा आणि लूटा हा एक कलमी कार्यक्रम साथसंगतीने राबविताना दिसतात. कारण सामान्य माणूस नावाच्या गुलाम नागरिकांकडून पाच वर्षातून एकदा मत लूटन घ्यायचा राष्ट्रीय कार्यक्रम उरकून घेतला की मग आजही या प्रातिनिधीक लोकशाहीत निवडून दिलेले लोकप्रतिनिधी आणि त्यांच्या हाताखाली काम करणारे सरकारी बाबू हे मिळून आम्हीच सरकार आहोत असे घोषीत करून राज्य सुरू करतात.गोरे इंग्रज गेले परतु आजही काळया इंग्रजाचे राज्य सुरू आहे,ही प्रचिती त्यामुळेच येते.गेल्या पासष्ट वर्षातील लोकशाहीचे हे एक प्रातिनिधीक चित्र आहे.

तपशीलात पाहिले तर आज प्रातिनिधीक लोकशाहीचे चित्र काय दिसते ते पाहूया.आपण पाहतो की निवडून येण्या अगोदर सरपंच पदाचा उमेदवार गावात सगळयासमोर हात जोडतो परंतु निवडून आला की गावात संरपचाची हुकूमशाही सूरू होते.निवडून येण्या अगोदर आमदारकीचा उमेदवार सगळया मतदारसंघाच्या पाया पडतो.परंतु निवडून आला की तो तालुक्याचा हुकूमशहा बनतो.सामान्य लोक दूर राहतात आमदार आणि त्याच्या चमच्याचे दरबारी राजकारण सुरू होते.त्याच प्रमाणे खासदार जिल्हयाचा हुकुमशहा बनतो.राज्याचे मुख्यमंत्री आणि मंत्री लोकांशी वागताना हुकुमशहा असल्यासारखे वागतात.पंतप्रधानांना सामान्य माणूस भेटू शकत नाही.कारण त्यांच्याभोवती नेहमीच ५०० पोलीसांचा गराडा असतो.२५ लालदिव्याच्या गाडयामधील कोणत्या काळया काचाच्या आड आम्ही निवडून दिलेला सर्वोच्च सेवक बसला आहे.हे आम्हाला कळत सुद्धा नाही.आम्ही भारताचे मालक असणारे लोक पंतप्रधानाना एक निवेदन देवू शकत नाही. फारच हट्ट करून पंतप्रधानांना भेटायचे ठरविले तर पोलीस आम्हा सामान्य जनतेच्या गांडीवर काठया घालतात.सामान्य माणसांची या देशाच्या मालकाची हिच काय ती किंमत ? भारताला स्वातंत्र्य मिळून ६५ वर्षे झाली.आज देशाच्या राजकारणाचे चित्र अंत्यत भेसूर झाले आहे.आज (सन्माननीय अपवाद वगळता) देशातील गावागावात सरपंचाची हुकुमशाही चालू आहे.शहरावर महापौर,नगराध्यक्षांचीच दादागिरी सुरू आहे.राज्यावर मंत्र्यांची दबंगशाही सुरू आहे.मुख्यमंत्र्यांची बेझूटशाही सुरू आहे.तर

## गुलाम जब उठ खडे होते है, तो उनके पास खोने को सिर्फ जंजीरे होती है !

देशावर सत्ताधारी व विपक्ष त्यांच्या पिळावली ,ठेकेदार आणि विकृत भांडवली शक्तीची लूटशाही सुरू आहे.हे सगळे का होते आहे.कारण प्रातिनिधीक लोकशाहीचा अतिरेक झाला आहे.सगळे सत्तेचे निर्णय घेण्याचे अधिकार लोकप्रतिनिधीकडे व सरकारी बाबुकडे केंद्रीत झाले आहेत.देशाचा प्रतंप्रधान हा सत्ताधारी पक्षाच्या हातातील बाहुले बनत असेल तर घटनात्मक सत्तेचा केंद्रबिंदू नको तेथे सरकला जातो.आणि प्रचंड अशी करोडो आणि अब्जावधीच्या घोटाळयाची मालिका सुरू होते.देशासमोरील मोठे घोटाळे कोणी व कसे केले?या न्यायालयीन चौकशीमध्येच एक मानवी पिढी संपून जाते.नवे घोटाळे सुरूच राहतात.वूई दि पिपल ऑफ इंडिया, असहाय्य आणि हतबल असल्याचे दिसून येते. या देशातील राज्यकर्त्यांनी उच्च वर्ग व उच्च मध्यमवर्गीयांचा अपेक्षाभंग केल्याने ते मतदान सुद्धा करीत नाहीत.कोणत्याही निवडणूकीत सरासरी ५० टक्के मतदान होते. त्यातील मोठा वाटा हा शहरी झोपडपट्टी व ग्रामणी गरीबांचा असतो.गरीब लोकांकडून मते विकत घेवून लोकप्रतिनिधी,नोकरशहा,ठेकेदार आणि भांडवलदार यांची चौकडी या देशावर राज्य करीत आहे. हे सामान्य माणसांचे राज्य नाही.

जनता सरकारसाठी आहे परंतु सरकार जनतेसाठी नाही,अशी दुर्भाग्यपूर्ण स्थिती निर्माण झाली आहे.

लोकप्रतिनिधीची राजनिति अमरे रहे !

तसचे गुलाम नागरिकांची गुलामीही अमर रहे !!

आम्ही हतबल आहोत की लढवय्ये आहोत ? याचा फैसला काळच करील.

-सुभाष बसवेकर

नीतिनियम व कायदा नसेल तर स्वातंत्र्य असूच शकत नाही .

# आरटीआय अर्ज करा पटकन अडलेले सरकारी काम होईल झटकन !

मित्रहो आपण रेशनकार्ड,उत्पन्नाचा दाखला,जातीचा दाखला,पासपोर्ट,वाहन परवाना,दुकान परवाना आदी कामासाठी शासकीय कार्यालयात अर्ज करतो परंतु आपले काम अडवून ठेवले जाते.पंधरा दिवस वा महिन्यापेक्षा अधिक कालावधी झाला तरी काम होत नसेल तर खालील प्रमाणे अर्ज करा तुमचे काम लवकर व पटकन होण्याची शक्यता निर्माण होते.

केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अनुसार अर्ज

(जोडपत्र " अ "नियम ३ नुसार)

प्रति,

जनमाहिती अधिकारी

.............................................

.............................................

१) अर्जदाराचे नांव - -----------------------------------------------

२) अर्जदाराचा पूर्ण पत्ता : -----------------------------------------------

३) माहितीचा विषय - -----------------------------------------------

४)आवश्यक असलेल्या माहितीचा तपशील व कालावधी (पुढीलप्रमाणे)

मी आपल्या शासकीय कार्यालयात मी माझ्या --------------------------- या कामासाठी दि. ---------- रोजी अर्ज / आवेदन केलेले आहे. सोबत प्रत जोडत आहेत.

या सबंधी मुद्देनिहाय माहिती मला माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये द्यावी.

अ) मी अर्ज केल्यापासून आज पर्यंत माझ्या अर्जावर घेतलेल्या दैनंदिन निर्णयाची नोंद व सद्यस्थितीच्या नोंदीची नोंदवहीतील झेरॉक्स प्रत द्यावी.

ब) माझ्या अर्जावर सक्षम अधिकारी यांनी शेरा / टिपण्णी नोंदीची झेरॉक्स प्रत द्यावी.

क) शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ अन्वये नागरिकांची सनद प्रमाणे माझे काम पूर्ण होण्याचा कालावधीची मुदत संपूनही जर माझे काम झालेले नसेल तर तेथून पुढे झालेल्या विलंबास जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्याचे / कर्मचाऱ्याचे नाव व हुद्दा द्यावा.तसेच झालेल्या विलंबासाठी त्यांना काय कायदेशीर शास्ती /दंड व कार्यवाही होणार आहे याची कायदेशीर तरतूद असणारी नोंद / माहिती द्यावी.

५) माहिती टपालाने हवी की व्यक्तिश : स्पीड पोष्टाने / व्यक्तीश : घेऊन जाईन

६) अर्जदार दारिद्र्य रेषेखालील नाही (१० रूपयाचा कोर्ट फी स्टॅम्प जोडला आहे)

ठिकाण : ----------- अर्जदाराची सही

दिनांक : ------------- (नाव ----------------------------------)

# आमचा पैसा, आम्हाला पाहिजे हिशोब !

आमच्या घरातील लहान मुलगा ५० रुपये घेऊन दुकानात सामान आणायला आम्ही पाठवितो.खरेदी करुन आणलेले सामान व खर्च झालेले पैसे याचा आम्ही रुपयांन रुपयांचा आम्ही त्याच्याकडून हिशोब घेतो.जर आम्ही आमच्या मुलांकडून कसून हिशोब घेतो तर आमच्याच पैशातून चालणाऱ्या सरकारचा आम्ही हिशोब का घ्यायचा नाही ?

## ही काही वानगी दाखल उदाहरणे

आपल्या गावातील / शहरातील रस्ते, विकासकामे इमारत बांधकामे यांच्यातील खर्चाचा हिशोब मागा.

स्थानिक स्वराज संस्थाना मिळणारा निधी, कररूपाने गोळा होणारा निधी, सामान्य माणसांना मिळालेल्या मदत यांचा हिशोब मागा.

शेतकऱ्यांना पंचायत समितीकडून मिळणाऱ्या वस्तू जसे, कृषी अवजारे, फवारणी पंप,इंजिन, इतर वस्तू या प्रत्यक्ष योग्य व पात्र लाभार्थी पर्यंत मिळतात का ?

शहरी व ग्रामीण भागात दारिद्रय रेषेखालील, महिलांना,विधवा महिलांना शिलाई मशीन, कांडप मशीन, शेवया मशिन व अन्य मदत वाटली जाते.ती योग्य व पात्र लाभार्थींना मिळते का ?

ग्रामीण व शहरी भागात दारिद्रय रेषेखालील मुलींना शाळेत उपस्थिती भत्ता देण्याची सरकारी योजना आहे परंतु प्रत्यक्षात मुलींना तो मिळतो का ? शोध घ्या.

शाळेत गरीब मुला -मुलींना सायकल, गणवेश,पुस्तके वाटप होते.प्रत्यक्षा किती मंजूर झाले, किती वाटप झाले.पात्र व गरजूना मिळाले की मध्येच कोणी लांडगयांनी खाल्ले याचा हिशोब घ्या.




आम्ही भारतीय जनता रोज काबाडकष्ट करतो.आमचा शेतकरी भाऊ शेतीत रक्त आणि घाम गाळतो अन्नधान्य निर्माण करतो.कामगार व श्रमिक घाम गाळून संपत्ती व चिजवस्तू निर्माण करतात.या देशातील प्रत्येक माणूस या संपत्तीचा उपभोग घेताना त्यावर सरकारला टॅक्स भरतो.सामान्य माणसाने अगदी हॉटेलात दहा रूपयांचे शंभर ग्रॅम भजे जरी खाल्ले तरी यावर सरकारला बेसन पीठ, तेल यांच्या उत्पादनावरील विक्रीकराच्या माध्यमातून रूपयां दोन रूपयांचा कर गेलेला असतो.अगदी १० रूपयांचा मोबाईल रिचार्ज केला तरीही शासनाला गरीब माणसाचे २ रूपये कराच्या रूपाने जमा झालेले असतात.सांगण्याचा उद्देश हा की सरकारकडे जमा झालेले अब्जावधी रूपये हे जनतेचे असतात.हा जनतेचा पैसा जनतेच्या उपयोगासाठीच वापर झाला पाहिजे.यावर मध्येच भ्रष्ट लांडग्यांनी ताव मारता कामा नये.सत्तेतील भ्रष्ट लोकसेवक व अधिकारी व कर्मचारी मंडळीनी या पैशाचा अपहार न केला पाहिजे. मात्र आज असे होताना दिसत नाही. सत्ताधारी व प्रशासनातील भ्रष्ट लोकसेवकांचे जागोजागी रॅकेट तयार झाले असून ते जनतेच्या पैशावर ताव मरीत आहेत.प्रत्येक खात्यात व प्रत्येक योजनेत हजारो भ्रष्टाचाराची प्रकरणे दिसून येत आहेत.हा देश एक मोठी व भ्रष्ट गटारगंगा झाला अहे.

रस्ते,वीज,पाणी, सार्वजनिक अन्न पुरवठा, इंधनपूरवठा,गरीबांसाठीच्या हजारो योजना,स्थानिक स्वराज संस्थापासून ते अगदी मुंबई व दिल्ली तील मोठमोठया योजना पर्यंत सगळीकडे भ्रष्ट लाडग्यांचा टक्का ठरलेला असतो.सामान्य माणूस या टक्कयाकड ेडोळ वटारून पाहत नाही.म्हणून त्यांची मजा आहे.परंतु आता सामान्य माणूस पेटून उठणार आहे.भ्रष्टांचे दिवस भरत आहेत.

एकदा समता हे तत्व मान्य केले की इतरांचा हिस्सा मान्य करणे होय.

जनजागृती ! संरक्षण !! संघर्ष !!!

# माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ, महाराष्ट्र

आरटीआय कार्यकर्त्यांची राज्यव्यापी एकजूट !

संपर्क : प्लॉट नं.डी-२२, सेक्टर- १२ खारघर, नवी मुंबई -४१०२१०

## सभासद फार्म

फोटो

नाव : ----------------------------------------------------------------

पत्ता :----------------------------------------------------------------

----------------------------------- पीनकोड

मोबाईल :

ई मेल :---------------------

शिक्षण : ----------------------- जन्मदिनांक ------------------------------

व्यवसाय :--------------------- येणाऱ्या भाषा: -------------------------------

माहिती अधिकार कार्य व समाजकार्याचा अनुभूव किती वर्षाचा आहे: ---------------------

इतर कोणत्या राजकीय किंवा सामाजिक संस्थेशी संबधीत आहात : ---------------------

माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे पदाधिकारी म्हणून कोणत्या स्तरावर कार्य करण्यास इच्छूक आहात ? :गाव/ शहर/ तालूका / जिल्हा /------------------------------------

मी प्रतिज्ञापूर्वक आणि विवेकपूर्वक निवेदन करतो की मला आपण माहिती अधिकार कार्यकता महासंघाचा वार्षिक सभासद करून घ्यावे.मी ओळखपत्र खर्च २०० रूपये पोष्टेज खर्च १०० रूपये आणि २०० रूपयांची तीन पुस्तक व स्थानिक शाखा शुल्क १०० रूपये असे एकत्रीत ६०० रूपये भरीत आहे.सभासद ओळखपत्र व नागरिक अधिकार विषयक पुस्तके मला माझ्या पत्यावर पाठवून द्यावीत.मी भारतीय संविधानाने घालून दिलेल्या कायदेशीर कक्षेत नागरिक म्हणून दिलेल्या अधिकारक्षेत्रातच कार्य करीनृ तसेच माहिती अधिकार महासंघाच्या कार्यकर्ता आचारसंहितेचे काटेकोर पालन करीन.कोणतेही बेकायदेशीर कृत्य करणार नाही. आपला विस्वासू

दिनांक : / /

ठिकाण : ------------- सही

सभासद कोड नंबर

### कार्यालयीन उपयोगासाठी

- ओळखपत्र मुदत आरंभ दिनांक / / २०१५ मुदत समाप्तीचा दिनांक / / २०१६
- पदाधिकारी म्हणून नियुक्ती झाली ते पद ------------------------------ आयडी पाठविलाचा दिनांक /पोस्ट / कुरिअर
- सभासद प्रक्रिया शुल्क मनिऑर्डर / बँक अकाऊंट / डी.डी./चेक ने दि. / / २०१ रोजी जमा झाली

**आपण वेबसाईट rtimahasangh.weebly.com वरूनही ऑनलाईन फार्म भरू शकता**

समता, स्वातंत्र्य व न्याय यांची योग्य ती सरमिसळ म्हणजे उदारवाद होय !

# माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ, महाराष्ट्र

## कार्यकर्त्यांना आवाहन

महाराष्ट्रातील माहिती अधिकार कार्यकर्ते,सामाजिक व राजकीय क्षेत्रातील कार्यकर्ते ,पत्रकार जागरूक नागरिक यांच्याकडून - शासकीय कार्यालयातील भ्रष्टाचार व गैरव्यवहारांची अनेक प्रकरणे बाहेर काढण्यासाठी माहितीचा अधिकार या कायद्याचा मोठ्या प्रमाणात वापर सुरू झालेला आहे.परंतु सदर कायद्याचा आणखी परिणामकारक वापर व्हावा व त्यातून प्रशासन आधिक पारदर्शी व लोकाभिमूख व्हावे या उद्देशाने माहिती अधिकारांचा वापर करणाऱ्या व करू इच्छिणाऱ्या जागरूक नागरिकांचे परस्परांना मदत व सहकार्य व्हावे व त्यांना वैधानिक मार्गदर्शन आणि सहकार्य मिळावे तसेच प्रशासनातील भ्रष्टाचार चव्हाट्यावर आणण्यासाठी माहिती अधिकार कायदा नेमकेपणे कसा वापरावा ? नेमकी व मुद्येसूद माहिती कशी विचारावी ? कार्यकर्त्यांच्या अनुभवांची परस्परात देवाणघेवाण व्हावी म्हणून आरटीआय कार्यकर्त्यांचे महाराष्ट्रव्यापी व्यासपीठ असणे गरजेचे झाले आहे

.तसेच माहिती अधिकार कार्यकर्त्यावर गंभीर हल्ले करणे तसेच धमक्या देणे असे प्रकार खूपच वाढले आहेत.या पासून कार्यकर्त्यांना सरंक्षण मिळावे तसेच त्यांना राज्याच्या राजधानी पासून ते आपल्या गावापर्यंत पाठबळ मिळावे म्हणून कार्यकर्त्यांच्या एकजूटीची खूपच आवश्यकता आहे. यासाठी तसेच महाराष्ट्रभरातील अनेक कार्यकर्त्यांशी व्यापक बोलणी व चर्चा केल्यानंतर आम्ही महाराष्ट्रव्यापी व सर्व राजकीय प्रवाहापासून अलिप्त व शुद्ध सामाजिक असा **माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ, महाराष्ट्र** स्थापन केला असून या अंकामध्ये यांसबंधीचा एक सभासद फॉर्म दिला आहे.या महासंघाचे जिल्हा तालुका व शहर स्तरावरील पदाधिकारी म्हणून काम करण्यास इच्छूक असणारे माहिती अधिकार कार्यकर्ते, दक्ष व जागरूक नागरिकांनी या अंकात पान ७ वर दिलेला सभासद फॉर्म झेरॉक्स करून सविस्तर भरून फोटो चिकटवून तो सायबर कॅफेमधून स्कॅन करूनही **rtimahasangh@gmail.com** या ई मेलवरूनही पाठविल्यास अधिक सोईचे होईल.. ओळखपत्र खर्च / पोष्टेज व नागरिक अधिकार प्रकाशनांची तीन पुस्तके असे एकत्रीत मुल्य ६०० रूपये स्टेट बँक ऑफ इंडिया च्या कोणत्याही शाखेतून खाते नंबर **32619447406** स्वराज बहुउद्देशिय संस्था,खारघर नवी मुंबई या नावाने भरावेत..बँकेत पैसे भरताच आपले नाव व पत्ता **9223516920** या नंबरवर फोन करून कळवावा.आपणास आपल्या पत्यावर सभासद ओळखपत्र व पुस्तके पाठवली जातील.सभासदांना महासंघाच्या वेबसाईडवरून **web site : rtimahasangh.weebly.com** ऑनलाईन फार्म भरता येईल.तरी जास्तीत जास्त माहिती अधिकार कार्यकर्त्यांनी सभासद व्हावे असे आवाहन करण्यात येत आहे.

पोष्ट परवाना No.G/NMD/128/2012-14

प्रति,

पाठविणार

पत्ता: **नागरिक अधिकार**

प्लाट नं. ई-९६, सेक्टर -१२ खारघर

नवी मुंबई ४१०२१०

महाराष्ट्र

मो ९२२३५१६९२०

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक सुभाष महादेव बसवेकर यांनी स्वराज प्रिंट प्रोसेस कार्यालय, सेक्टर-१०, कोपरा ब्रीजजवळ, खारघर ता.पनवेल जि.रायगड ४१० २१० येथे मुद्रीत करून, अे विंग फ्लॅट-०३ साईसदन सोसायटी प्लॉट नं.५६ सेक्टर-१९ खारघर ता.पनवेल जि.रायगड ४१० २१०येथे प्रकाशीत केले. रजि नं. MAHMAR/2011/40781